**प्रेस नोट दिनांक १३/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**मोटरसायकलवरुन जात असताना, मोटरसायकलस्वाराचा पडलेला मोबाईल फोन ताब्यात घेऊन तो मोटर सायकलस्वारास परत**

-----------||-----------

दि. १३.०७.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणेकडील सी. आर. मोबाईल गाडीवरील कर्मचारी पोलीस नाईक - सुरज शेडगे, पोलीस शिपाई वळवी, मपोना शिंदे असे प्रेस्टीज पॉईट, शुक्रवार पेठ, पुणे या ठिकाणी कर्तव्यावर असताना, सकाळी ११.०० वा. चे सुमारास एक मोटरसायकलस्वार सदर ठिकाणाहुन जात असताना त्याचेकडील सॅमसंग जे-२ मोबाईल फोन पडजा. परंतु मोटरसायकलस्वारास सदरची बाब न समजल्यानेत तो तसाच पुढे निघुन गेला.

नमुद कर्मचारी यांनी सदर ठिकाणी क्लासेस असल्याने तेथे गाडीवरुन पी. ए. सिस्टीमवरुन मोबाईल फोन कोणाचा हरवला असल्यास तो घेऊन जाणेबाबतचे आवाहन केले. मोबाईल गहाळ झालेला मुलगा तक्रार देणेसाठी पोलीसांकडे जाणार त्यावेळी त्याचे मित्रांनी त्यास मोबाईल फोन पोलीसांना मिळाल्याचे सांगुन त्यास गाडीजवळ पाठवुन दिले. सदर मुलगा आमचेकडे आले असता त्याने त्याचे नाव - संदिप रमेश येलके वय २३ वर्षे, रा. संगमनेर जि. अहमदनगर असे असल्याचे सांगीतले. सदर मुलाकडे मोबाईल फोनबाबत खातरजमा करुन सदरचा सॅमसंग मोबाईल फोन मॉडेल जे-२ किंमत रुपये ७,५००/- चा ताब्यात देण्यात आला.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

